ज्ञानवर्धिनी संस्थेचे

# सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर

## महिला विकास कक्ष

---

# भव्य रक्तदान शिबीर

## अहवाल

मंगळवार, दि. ०९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ०३:०० या दरमान्य सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर येथे महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, एचडीएफसी बँक, राष्ट्रीय छात्र सेवा (NCC), राष्ट्रीय सेवा योजना (NSS), महिला विकास कक्ष (WDC), सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग आणि सर जे जे महानगर रक्तपेढी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'भव्य रक्तदान शिबीराचे' आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबीराचा उद्घाटन ज्ञानवर्धिनी संस्थेच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष मा. श्री. बाळा पाटील, कार्यकारी समितीचे उपाध्यक्ष मा. श्री. चंद्रशेखर अधिकारी आणि कार्यकारी समितीचे सचिव मा. श्री. दिलीप भोपतराव यांच्या हस्ते झाले. सदर प्रसंगी कार्यकारी समितीचे सदस्य मा.श्री. बाळासाहेब खारीक, मा. श्री. वैभव जगे, मा.श्री. दिपक बजाज, मा.श्री. अरुण कासार, मा. श्री. अनिल निचिते, मा.श्री. कल्पेश दुधाळे, श्रीमती. अपर्णाताई खाडे, विश्वस्त समिती सदस्य मा.श्री.मोरेश्वर भागवत, महाविद्यालयाचे प्राचार्य व मुंबई विद्यापीठाचे मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रो. डॉ. अनिल सिंह, HDFC बँकेचे डेप्युटी व्हॉईस प्रेसिडेंट श्री. मंदार चव्हाटे, सिनिअर मनेजर श्री. हर्षद बर्वे, जे. जे. महानगर रक्तपेढीचे डॉ. सचिन चौधरी, जनसंपर्क अधिकारी श्री. अजय भिसे यांच्या विशेष उपस्थितीत पार पडला.

HDFC बँकेचे डेप्युटी व्हॉईस प्रेसिडेंट श्री. मंदार चव्हाटे यांनी HDFC बँकेची रक्तदान या उपक्रमात असलेल्या भूमिकेबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य व मुंबई विद्यापीठाचे मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रो. डॉ. अनिल सिंह यांनी स्वागतपर मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना रक्तदान करण्याचे आवाहन करून रक्तदानाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सदर भव्य रक्तदान शिबीरात महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिपाई आणि महाविद्यालयाचे आजी आणि माजी विद्यार्थी अशा एकूण २७ जणांनी रक्तदान केले.हा भव्य रक्तदान शिबीर यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिल सिंह, उपप्राचार्य डॉ. संतोष गायकवाड, IQAC चे समन्वयक प्रो.डॉ.एस.एस. वाघमोडे, NCC युनिटचे प्रमुख लेफ्टनंट डॉ. संतोष बुधवंत, NSS चे कार्यक्रम अधिकारी डॉ. राजू शनवार, प्रा. संजय तडवी, महिला विकास कक्ष समन्वयक डॉ. सीमा परटोले, WDC सदस्य डॉ. अश्विनी ओव्हाळ, प्रा. निशीगंधा जगे, प्रा. अर्चना घनघाव, प्रा. सरला कातकाडे, प्रा. स्वाती फर्डे, प्रा. स्वाती जाधव आणि प्रा. मोनिका बांगर यांनी विशेष मेहनत घेतली. रक्तदान शिबिराच्या उद्घाटन सोहळ्याचे सुत्रसंचालन डॉ.राजू शनवार यांनी केले तर प्रा. संजय तडवी यांनी रक्तदान शिबिरास उपस्थितीत सर्वांचे आभार मानले. या भव्य रक्तदान शिबीराची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.